# निशाणी क्र.०१ खालील आदेश
# (CNR No. MHTH21000272-2022)

०१. प्रस्तुतचा अर्ज जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) अन्वये मुत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत दाखल केला आहे.

०२. अर्जदाराने असे कथन केले की, त्यांची पत्नी नामे रोहिणी रविंद्र आके यांचा मृत्यू दिनांक २१/११/१९९० रोजी मौजे अंभई, ता. वाडा, जि. पालघर येथे झाला आहे. अर्जदार यांच्या पत्नीच्या मृत्युची नोंद गृप ग्रामपंचायत अंभई–आमगांव–खुटल, ता. वाडा, जि. पालघर यांच्याकडे केली नाही. अर्जदाराला कायदेशीर बाबीकरीता मृत्यु प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्ज मंजूर होण्यास विनंती केली आहे.

०३. सदर प्रकरणात दि.२०/१२/२०२२ रोजीच्या 'बित्तबातमी' या वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन केले असता कोणाचाही आक्षेप आला नाही. तसेच त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर राहिले आहे.

०४. अर्जदाराचे शपथपत्र नि.क्र.५ अन्वये दाखल केले. त्यांनी त्यांच्या शपथपत्रात अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केले आहेत. त्याच बरोबर गृप ग्रामपंचायत अंभई–आमगांव–खुटल, ता. वाडा, जि. पालघर यांनी दिनांक ०५/०७/२०२२ रोजी नुसार दिलेले मृत्यु नोंद नसलेबाबतचे त्यांचे म्हणणे नि. ३/४ वर दाखल आहे. तसेच अर्जदार यांचे ओळखपत्र दप्तरी दाखल केले आहे. त्याच बरोबर दि.२०/१२/२०२२ रोजीच्या 'बित्तबातमी' या वर्तमान पत्रात दिलेले जाहीर प्रगटन दप्तरी दाखल केले आहे. अर्जदाराचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज विना उजर व आक्षेप विना राहिले आहे

०५. अर्जदाराचा पुरावा व संपूर्ण दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता व विधिज्ञांचा युक्तीवाद लक्षात घेता, अर्जदाराची पत्नी नामे रोहिणी रविंद्र आके यांचा मृत्यू दिनांक २१/११/१९९० रोजी मौजे अंभई, ता. वाडा, जि. पालघर येथे झाल्याचे निदर्शनास येते. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद संबंधीत कार्यालयात केली

नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) अन्वये संबंधीत अधिकारी यांना त्यांच्या मुत्यूची नोंद घेण्यास निर्देशीत करणे विधिसंगत वाटते. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. संबंधीत अधिकारी यांना निर्देशीत करण्यात येते की, नियमाप्रमाणे शुल्क भरल्यानंतर, अर्जदाराची पत्नी नामे रोहिणी रविंद्र आके यांचा मृत्यू दिनांक २१/११/१९९० रोजी मौजे अंभई, ता. वाडा, जि. पालघर येथे झाल्याची नोंद संबंधीत नोंदवहीत नोंदवावी.

०३. येणे प्रमाणे संबंधीतास पत्र पाठविण्यात यावे.

सही/—

दिनांक : २६/०९/२०२४.

( रितेश वि. निकम )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, वाडा.